# उलगडला बेळगाव ते अमेरिकेपर्यंतचा प्रवास

## ठाणेदारांना जागतिक मराठी भूषण पुरस्कार प्रदान



सचिन फुलसुंदर

जागतिक मराठी अकादमी आणि डी. वाय. पाटील विद्यापीठ यांच्यातर्फे देण्यात येणारा जागतिक मराठी भूषण पुरस्कार डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते श्रीनिवास ठाणेकर यांना बुधवारी प्रदान करण्यात आला.

> “ अमेरिकेतील सर्वांत मागास परिसराचा मी खासदार आहे. तेथील सर्व तरुणांना उत्तम दर्जाचे शिक्षण, आरोग्य मिळावे, यासाठी मी प्रयत्न करीत आहे. तेथील नागरिकांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्याची माझी इच्छा आहे.
>
> – श्रीनिवास ठाणेदार

**म. टा. प्रतिनिधी**, पिंपरी

शालेय जीवनात पायात चप्पल नसलेला एक मुलगा अमेरिकेत जाऊन यशस्वी उद्योजक होतो. एवढेच नव्हे, तर पैसा म्हणजे सर्वस्व नाही या भावनेतून भरभराटीला आलेला उद्योग मुलांच्या हाती सोपवून समाजकार्यात वाहून घेतो आणि अमेरिकेच्या संसदेत पहिला मराठी खासदार म्हणून निवडून जातो. हे सर्व शिक्षण आणि जिद्दीच्या जोरावर केले, असे सांगून सर्वांसमोर साधेपणाचा वस्तुपाठ ठेवतो. अमेरिकेतील यशस्वी उद्योजक तथा पहिले मराठी खासदार श्रीनिवास ठाणेदार यांच्या मुलाखतीत त्यांचा जीवनप्रवास अलगदपणे उलगडला.

जागतिक मराठी अकादमी आणि डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी यांच्यातर्फे ठाणेदार यांना जागतिक मराठी भूषण पुरस्काराने बुधवारी सन्मानित करण्यात आले. डॉ. डी. वाय. पाटील विद्याठापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, सदस्य सचिन ईटकर, उद्योजक कल्याण तावरे, शास्त्रज्ञ डॉ. मकरंद जावडेकर आदी या वेळी उपस्थित होते. फुटाणे आणि ईटकर यांनी ठाणेदार यांची मुलाखत घेतली.

‘बेळगावातील अतिशय गरीब कुटुंबात माझा जन्म झाला. आई-वडिलांकडे घरही नव्हते. मात्र, मी माझ्या शिक्षणात गरिबीचा अडसर येऊ दिला नाही. बीएससी केल्यानंतर नोकरी केली. नंतर एमएससी केले. त्यानंतर पीएचडीसाठी अमेरिकेत गेलो. चार वेळा व्हिसा नकारल्यानंतर पाचव्यांना मला अमेरिकेत जाता आले,’ असे ठाणेदार म्हणाले.

### ■ ‘घर, कंपनीही जप्त झाली’

अमेरिकेत २००८मध्ये मोठी आर्थिक मंदी आली. त्या वेळी बँकेने माझे घर आणि कंपनी जप्त केली. तरीही मी डगमगलो नाही. २००८मध्ये वयाच्या ५५व्या वर्षी मी नव्याने कंपनी सुरू करून अल्पावधीतच तिची उलाढाल हजारो कोटींवर पोहोचवली,’ असेही ठाणेदार म्हणाले.

सकाळ

# हा माझा नव्हे तर आपल्या भारतभूमीचा सन्मान

## अमेरिकेतील खासदार ठाणेदार यांची भावना; मराठीभूषण पुरस्कार प्रदान

**पिंपरी, ता. २२ :** “बुद्धिमत्ता आणि शिक्षणपद्धती या दोन बाबींवर महासत्ता बनलेला अमेरिकेत मी खासदार असलो तरी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने केलेला माझा सत्कार म्हणजे भारतभूमीचा सत्कार मी समजतो,” अशी भावना अमेरिकेतील पहिले मराठी खासदार तथा संशोधक व उद्योगपती श्रीनिवास ठाणेदार यांनी व्यक्त केली.

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ यांच्यातर्फे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते ‘जागतिक मराठी भूषण पुरस्कार’ देऊन ठाणेदार यांना बुधवारी सन्मानित केले. त्यावेळी त्यांनी मातृभूमीबद्दल भावना व्यक्त केली. अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, अकादमीचे कोषाध्यक्ष उदय लाड, सदस्य सचिन ईटकर, शास्त्रज्ञ डॉ. मकरंद जावडेकर, उद्योगपती कल्याण तावरे, विद्यापीठ संचालिका डॉ. स्मिता जाधव, डॉ. यशराज जाधव आदी उपस्थित होते. ठाणेदार यांचा आज वाढदिवस असल्याने सुवासिनींनी औक्षण करून व केक कापून त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रशासन आणि राजकारणी हे लोकशाही रचनेमध्ये बदल घडविणारे दोन मोठे स्तंभ असून ध्येय ठेवणे व प्रयत्न करणे हेच आपल्या अमेरिकेत यशस्वी उद्योजक होण्याचे व खासदार होण्याचे श्रेय असल्याचे त्यांनी सांगितले. जिद्द व आत्मविश्वास हा जीवनाचा पाया बनविण्याचा ठाणेदार यांचा आम्हाला अभिमान वाटत असल्याचे मत डॉ. पाटील यांनी व्यक्त केले.



पिंपरी : अमेरिकेतील पहिले मराठी खासदार, संशोधक आणि उद्योगपती श्रीनिवास ठाणेदार यांना ‘जागतिक मराठीभूषण पुरस्कार’ प्रदान करताना डॉ. पी. डी. पाटील. (डावीकडून) कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, उदय लाड, रामदास फुटणे, पाटील, ठाणेदार, डॉ. मकरंद जावडेकर, डॉ. स्मिता जाधव, सचिन इटकर व कल्याण तावरे.

### वयाच्या नव्वदीतील नियोजन

पराभवाची भीती न बाळगता सतत धोका पत्करणे हीच जीवन पद्धती आपण स्वीकारली आहे. आज माझे वय ६८ वर्ष आहे. पण, पुढील बावीस वर्षांचे जीवनाचे लेखी नियोजन तयार आहे, असे प्रकट मुलाखतीत सांगून ठाणेदार यांनी ध्येयासक्त जीवनपद्धतीचा माहिती विद्यार्थ्यांना दिली. बेळगाव येथील मराठी कुटुंबातील अतिशय खडतर जीवन ते अमेरिकेत उद्योजक व खासदार असा प्रवास त्यांनी मांडला. जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे व कार्यकारिणी सदस्य सचिन इटकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. महात्मा गांधींना आदर्श मानणारे डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांचा जीवनावर प्रचंड प्रभाव असून समाजाप्रती उत्तरदायित्व असणे व सामाजिक कार्यातून जनतेची परतफेड करणे हीच समाजाची सेवा असल्याचे आपण मानतो, असेही त्यांनी नमूद केले.

पुढारी

# राज्यकर्त्यांमध्ये लोकांचे आयुष्य बदलण्याचे सामर्थ्य

## श्रीनिवास ठाणेदार यांचा जागतिक मराठीभूषण पुरस्काराने पिंपरीत सन्मान

**पिंपरी : पुढारी वृत्तसेवा**
**लोकांचे आयुष्य बदलण्याचे सामर्थ्य राजकर्त्यांमध्ये असते. त्यांच्याकडून लोकांना खूप अपेक्षा असतात. लोकांना चांगले शिक्षण मिळावे, त्यांना आरोग्याच्या उत्तम सुविधा मिळाव्यात, त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता व्हावी, यासाठी राज्यकर्त्यांनी झटले पाहिजे, असे प्रतिपादन अमेरिकन संसदेचे नवनिर्वाचित पहिले मराठी खासदार तथा उद्योजक श्रीनिवास ठाणेदार यांनी बुधवारी केले.**



**पिंपरी - संत तुकारामनगर येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्रेक्षागृहात जागतिक मराठीभूषण पुरस्काराने अमेरिकन संसदेचे नवनिर्वाचित पहिले मराठी खासदार तथा उद्योजक श्रीनिवास ठाणेदार यांना सन्मानित करण्यात आले. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते हा सन्मान झाला. त्याप्रसंगी (डावीकडून) डॉ. एन. जे. पवार, उदय लाड, रामदास फुटाणे, डॉ. पी. डी. पाटील, श्रीनिवास ठाणेदार, मकरंद जावडेकर, डॉ. स्मिता जाधव, सचिन ईटकर, कल्याण तावरे आदी.**

जागतिक मराठीभूषण पुरस्काराने ठाणेदार यांना डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पिंपरीतील संत तुकारामनगर येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्रेक्षागृहात हा कार्यक्रम झाला. जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला. त्याप्रसंगी ठाणेदार बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पी. डी. पाटील होते. विद्यापीठाच्या विश्वस्त आणि कार्यकारी संचालक डॉ. स्मिता जाधव, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, उद्योजक कल्याण तावरे, मकरंद जावडेकर, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष तथा वात्रटिकाकार रामदास फुटाणे, अकादमीचे कोषाध्यक्ष उदय लाड, कार्यकारिणी सदस्य सचिन ईटकर आदी उपस्थित होते. श्रीनिवास ठाणेदार यांची मुलाखत रामदास फुटाणे आणि सचिन ईटकर यांनी घेतली. डॉ. स्मिता जाधव यांनीदेखील काही प्रश्न विचारले.

या मुलाखतीमध्ये ठाणेदार यांचा जीवनपट उलगडला. बेळगावच्या शाळेत शिकणारे ठाणेदार हे जिद्द आणि मेहनतीच्या बळावर एक यशस्वी उद्योजक आणि अमेरिकन संसदेत खासदार असा प्रवास करू शकले. मुलाखतीतून उलगडलेला त्यांचा हा जीवनप्रवास उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

**तरुणांनी उच्च ध्येय ठेवावे**

तरुणांनी जीवनामध्ये उच्च ध्येय ठेवायला हवे. तसेच, त्या ध्येयाची पूर्ततेसाठी नियमित काम करत राहायला हवे, असे मत ठाणेदार यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की, आपण दीर्घकालीन नियोजन करावे. स्वतःवर विश्वास ठेवावा. जीवनामध्ये 'रिस्क' घ्यायला शिकले पाहिजे. ध्येयाचा प्रवास करताना कधी-कधी अपयश येईल. मात्र, त्यामुळे खचून न जाता यश मिळविण्यासाठी सतत प्रयत्न करत राहायला हवे.

डॉ. पी. डी. पाटील म्हणाले की, श्रीनिवास ठाणेदार यांचा जीवनप्रवास कौतुकास्पद आहे. त्यांच्या अनुभवातून आपल्याला खूप काही शिकण्यासारखे आहे. व्यक्तीने जिद्द ठेवली, संघर्ष केला तर त्याला नक्कीच यश मिळते. आपण जीवनात मोठे होण्याचे ध्येय ठेवायला हवे. दूरदृष्टी आणि व्हीजन ठेवून काम करत राहायला हवे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक फुटाणे यांनी केले. डॉ. पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### पुरस्कार आणि वाढदिवस हा दुग्धशर्करा योग

ठाणेदार यांना बुधवार (दि. २२) रोजी पुरस्कार प्रदान केला. त्यांचा ६८ वा वाढदिवसदेखील होता. हा दुग्धशर्करा योग जुळून आल्याचे डॉ. पी. डी. पाटील यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे या वेळी ठाणेदार यांचा औक्षण करून तसेच केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

My Pimpri Edition
Feb 23, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

सामना

# राज्यकर्त्यांनी सर्वसामान्यांचे आयुष्य चांगले केले पाहिजे

पिंपरी, दि. २२ (प्रतिनिधी) – हिंदुस्थान ही जगातील पाचवी महासत्ता आहे. लोकशाहीमध्ये निवडणुका निःपक्षपातीपणे झाल्या पाहिजेत. लोकांना मतस्वातंत्र्य असले पाहिजे. राजकारण्यांकडून लोकांची खूप अपेक्षा असते. त्यामुळे सरकारी यंत्रणांचा वापर करून सर्वसामान्यांचे आयुष्य चांगले कसे करता येईल, यासाठी राज्यकर्त्यांनी काम करणे गरजेचे आहे, असे मत अमेरिकन संसदेतील पहिले मराठी खासदार श्रीनिवास ठाणेदार यांनी व्यक्त केले.



जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी यांच्या वतीने अमेरिकन संसदेतील पहिले मराठी खासदार, संशोधक व उद्योजक श्रीनिवास ठाणेदार यांना विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते जागतिक मराठी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास ज्येष्ठ कवी व जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, डॉ. मकरंद जावडेकर, स्मिता जाधव, उदय लाड, कल्याण तावडे, सचिन इटकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस रामदास फुटाणे व सचिन इटकर यांनी श्रीनिवास ठाणेदार यांची प्रकट मुलाखत घेतली. यावेळी ठाणेदार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

ठाणेदार यांनी आपले खडतर बालपण ते मुंबईपर्यंतचा प्रवास आणि एम.एस्सी., पीएच.डी.च्या शिक्षणापासून हिस्सा मिळविण्यापर्यंत आलेल्या अडचणी, उद्योगात आलेले अपयश ते अमेरिकन संसदेत खासदार होण्यापर्यंतचा प्रवास कथन केला. राजकारणात येताना आपला उद्देश काय आहे, हे ठरवणे महत्त्वाचे असते. आज माझे वय ६८ वर्षे आहे. मात्र, पुढील २२ वर्षांतील माझ्या योजना तयार आहेत. अमेरिका आणि हिंदुस्थान ही सर्वात मोठी लोकशाही राष्ट्र आहेत. निवडणुका निःपक्षपातीपणे झाल्या पाहिजेत. लोकांना मतस्वातंत्र्य असले पाहिजे. आपली शिक्षण पद्धती बदलणे गरजेचे आहे. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या मूलभूत गरजा पूर्ण करून देण्याचे काम राज्यकर्त्यांचे आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करणे ही राज्यकर्त्यांची जबाबदारी आहे. तळागाळातील लोकांसाठी आणि समाजासाठी आपण काय करतोय याची जाणीव त्यांनी कायम ठेवली पाहिजे, असेही ठाणेदार यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Feb 23, 2023 Page No. 10
Powered by : eReleGo.com

लोकमत

# हा सत्कार माझ्यासाठी भारतभूमीचा

## श्रीनिवास ठाणेदार : जागतिक मराठी अकादमीच्या वतीने जागतिक मराठी भूषण पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पराभवाची भीती न बाळगता सतत धोका पत्करणे हीच जीवन पद्धती आपण स्वीकारली आहे. बुद्धिमत्ता आणि शिक्षणपद्धती या दोन बाबींवर महासत्ता बनलेला अमेरिकेतील मी खासदार असलो, तरी येथे झालेला माझा सत्कार म्हणजे भारतभूमीचा सत्कार समजतो. आज माझे वय ६८ असून, पुढील बावीस वर्षांचे जीवनाचे लेखी नियोजन तयार असल्याचे अमेरिकेतील पहिले मराठी खा. श्रीनिवास ठाणेदार यांनी म्हटले.

जागतिक मराठी अकादमी आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी यांच्या वतीने जागतिक मराठी भूषण पुरस्कार प्रदान बुधवारी करण्यात आला. त्या वेळी त्यांची मुलाखत घेण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, कोषाध्यक्ष उदय लाड, रामदास फुटाणे, कुलपती पी. डी. पाटील, श्रीनिवास ठाणेदार, शास्त्रज्ञ डॉ. मकरंद जावडेकर, डॉ. स्मिता जाधव, सचिन इटकर, कल्याण तावरे आदी उपस्थित होते.




**अमेरिकेतील पहिले मराठी खासदार, संशोधक व उद्योगपती श्रीनिवास ठाणेदार यांना 'जागतिक मराठी भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. बुधवारी त्यांचा वाढदिवस असल्याने यावेळी व्यासपीठावर केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. एन. जे. पवार, कोषाध्यक्ष उदय लाड, रामदास फुटाणे, कुलपती पी. डी. पाटील, श्रीनिवास ठाणेदार, शास्त्रज्ञ डॉ. मकरंद जावडेकर, डॉ. स्मिता जाधव, सचिन इटकर, कल्याण तावरे आदी.**

ठाणेदार म्हणाले, "महात्मा गांधींना आदर्श मानणारे डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांचा आपल्या जीवनावर प्रचंड प्रभाव असून, समाजाप्रती उत्तरदायित्व असणे व सामाजिक कार्यातून जनतेची परतफेड करणे हीच समाजाची सेवा असल्याचे आपण मानतो. प्रशासन आणि राजकारणी हे लोकशाही रचनेमध्ये बदल घडविणारे दोन मोठे स्तंभ असून, ध्येय ठेवणे व सातत्याने प्रयत्न करणे, हेच अमेरिकेत यशस्वी उद्योजक होण्याचे व खासदार होण्याचे श्रेय आहे. अमेरिकेत सुमारे ३० टक्के नागरिक गरिबीत जीवन जगत असले तरी आपण निवडून देणारा लोकप्रतिनिधी योग्य आहे की, अयोग्य आहे? याची पारख अमेरिकन नागरिकांना आहे.

कुठलेही काम करताना खचून जाऊ नका. स्वतः वरचा विश्वास तर बिलकुल गमावता कामा नये. ध्येय, उद्दिष्ट हे निश्चित करा व सातत्याने सकारात्मक प्रयत्न करत ते गाठण्याचा प्रयत्न ठेवा. मार्ग अपोआप खुला होत जाईल. असे त्यांनी म्हटले.

Pune Main
Page No. 12 Feb 23, 2023
Powered by: erelego.com